॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

*** सुविचार ***

प्रत्येक अडचणीत एक मोठा विजय लपलेला असतो.

अहिल्यानगर | गुरुवार, दि. ३ सप्टेंबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक ७३ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145 | www.veerbhuminews.com

## फोडणी

अरुण महादेव वाळुंज | अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### भेसळ

इथं भेसळ, तिथं भेसळ
कुणाला लागेना मेळ
खऱ्या खुऱ्या आयुष्यात
जनतेला झालाय खेळ

दूध असो वा अंडी
कुणी खाऊ द्या फिश !
जेवणाच्या थाळीत रोज
घेत नाही ना विष ?

# जरांगे मागण्यांवर ठाम; सरकारच्या भूमिकेकडे लक्ष

**उपोषणाचा पाचवा दिवस । प्रसाद लाड यांची भेट, मराठवाड्यातून हैदराबाद गॅझेट वाटपाची मागणी**

**जालना । वीरभूमी-**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवाली सराटी येथे बेमुदत उपोषण सुरू असून, उपोषणाचा पाचवा दिवसही त्यांनी आपल्या मागण्यांवर ठाम राहत सुरू ठेवला. भाजपा आमदार प्रसाद लाड यांनी जरांगे पाटील यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी त्यांच्या मागण्यांबाबत भूमिका मांडली; मात्र किमान चार प्रमाणपत्रे मिळाल्याशिवाय उपोषण सोडणार नसल्याचे जरांगे यांनी स्पष्ट केले.

हैदराबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्रांचे वाटप सुरू होऊ द्यावे, त्यानंतर पुढील भूमिका ठरवू, असे जरांगे यांनी सांगितले. हे वाटप मराठवाड्यातून सुरू करण्याची मागणीही त्यांनी केली. लाड यांनी पाणी पिण्याची विनंती केली असता, त्यांच्या शब्दाचा मान राखत पाणी पिणार; मात्र उपोषण सोडणार नसल्याचे जरांगे यांनी सांगितले. दोन दिवस सलाईन लावून पाणी घेणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

सातारा-कोल्हापूर गॅझेटच्या मागणीसाठी त्यांनी सरकारला दोन दिवसांची मुदत दिल्याचे सांगितले. तसेच मुंबईत आंदोलन करण्याच्या भूमिकेवरही ते ठाम आहेत. मराठा आरक्षणाचा विषय श्रेयवादात अडकला असून, श्रेय शिंदे यांनी घ्यायचे की फडणवीस यांनी, यावरून संघर्ष सुरू आहे, अशी टीका त्यांनी केली.

मध्यस्थीच्या भूमिकेवरून विखे पाटील यांच्यावरही जरांगे यांनी टीका केली. त्यांच्यावर विश्वास ठेवला; मात्र ते आमची दिशाभूल करत असल्याचा आरोप त्यांनी केला. विखे पाटील चर्चेसाठी का येत नाहीत, असा सवाल करत १२ तारखेपर्यंत सरकारची भूमिका पाहू, असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, उपोषणामुळे जरांगे पाटील यांची प्रकृती खालावल्याचे सांगण्यात येत असून, सरकार आंदोलनाची दखल घेत नसल्याचा आरोप करत मराठा समाजबांधव आक्रमक झाले आहेत. जालना जिल्ह्यातील केदारखेडा येथे जालना-जळगाव महामार्गावर मध्यरात्री टायर जाळून निषेध करण्यात आला. याशिवाय बीड-जालना महामार्गावरही टायर पेटवून रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनादरम्यान 'एक मराठा, लाख मराठा'च्या घोषणा देण्यात आल्या. पोलिसांच्या मध्यस्थीनंतर रस्ता रोको मागे घेण्यात आला. जरांगे पाटील यांची भेट घेण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांना अंतरवाली सराटी येथे पाठवण्यात आले असताना शिष्टमंडळ अद्याप भेटीस का आले नाही, असा सवाल करत आंदोलकांनी सरकारविरोधात घोषणाबाजी केली.

जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ मराठा समाजबांधवांनी जालना जिल्हा बंदची हाक दिली असून, सरकारने त्यांच्या मागण्यांवर लवकरात लवकर तोडगा काढावा, अशी मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे आता सरकार या आंदोलनावर कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## SPOT NEWS

### वाढत्या महागाईविरोधात राष्ट्रवादी आक्रमक

**मुंबई** – वाढत्या महागाईच्या मुद्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसरात आंदोलन करत सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. या आंदोलनात खासदार सुप्रिया सुळे सहभागी झाल्या. सीएसएमटी परिसरात झालेल्या आंदोलनात पक्षाचे मुंबईतील पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यकर्त्यांनी 'महागाई की मार नहीं चलेगी' अशा घोषणा देत सरकारचा निषेध केला. आंदोलनात काही कार्यकर्त्यांनी भाज्या आणि धान्यांचे हार गळ्यात घालून वाढत्या महागाईकडे लक्ष वेधले. महागाईवर बोलताना सुप्रिया सुळे यांनी सरकारी आकडेवारी आणि प्रत्यक्ष घरगुती खर्चातील फरकावर प्रश्न उपस्थित केला. 'फूड इन्फ्लेशन किती आहे, हा प्रश्नच आहे. तुम्ही घरी जाऊन तुमच्या आई, बहीण किंवा पत्नीला विचारा, किती महागाई झाली आहे. घरातील खर्च कसा भागवायचा, हा प्रश्न आज प्रत्येक कुटुंबासमोर आहे,'' असे सुळे म्हणाल्या. त्यांनी दूध, धान्य, भाज्या, कांदा, साखर यांसारख्या वस्तूंच्या किमतींचा उल्लेख करत सामान्य नागरिकांच्या अडचणींकडे सरकारचे लक्ष वेधले.

### देशातील छोट्या व्यापाऱ्यांना 'री केवायसी' अनिवार्य

**नवी दिल्ली** – तुम्ही छोटे व्यापारी असाल आणि क्यूआर कोड किंवा यूपीआयच्या माध्यमातून डिजिटल पेमेंट स्वीकारत असाल, तर १५ सप्टेंबर २०२६ ही अंतिम मुदत तुमच्यासाठी महत्त्वाची आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार डिजिटल पेमेंट स्वीकारणा-या व्यापाऱ्यांसाठी री-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक असल्याचे सांगितले जात आहे. मनी कंट्रोलच्या रिपोर्टनुसार, डिजिटल पेमेंट स्वीकारणा-या सर्व व्यापा-यांनी १५ सप्टेंबर २०२६पर्यंत री-केवायसी पडताळणी पूर्ण करणे आवश्यक आहे. या मुदतीपर्यंत री-केवायसी पूर्ण न केल्यास संबंधित व्यापाऱ्यांचे क्यूआर कोड ब्लॉक होऊ शकतात. त्यामुळे ग्राहकांकडून होणारे डिजिटल पेमेंट अडकण्याची शक्यता आहे. बनावट व्यापारी खाती आणि फसवणुकीला आळा घालण्यासाठी री-केवायसी महत्त्वाची आहे. काही व्यक्ती बनावट कागदपत्रांचा वापर करून किंवा इतरांच्या नावाने व्यापारी खाते उघडतात. री-केवायसीच्या माध्यमातून क्यूआर कोडच्या मागे असलेला दुकानदार किंवा व्यापारी खरोखर कोण आहे, याची पडताळणी करण्याचा प्रयत्न केला जातो. यामुळे बनावट व्यापारी खाती ओळखण्यास आणि त्यांच्यावर कारवाई करण्यास मदत होऊ शकते. त्याचबरोबर ऑनलाइन फसवणूक आणि मनी लॉन्ड्रिंगसारख्या गैरप्रकारांनाही आळा घालण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे.

# भारतीयांची मदत घेण्यास नेपाळचा नकार

**नवी दिल्ली । वीरभूमी-**

नेपाळमध्ये सहा दिवसांपूर्वी आलेल्या महाप्रलयाने हजारो नागरिकांना आपल्या कवेत घेतले. परिस्थिती अजूनही भीषण आहे. चिखलातील प्रेतं पायाखाली येत आहेत. अनेक लोक बेपत्ता आहेत, बेघर झाले आहेत. या नेपाळवासियांच्या मदतीसाठी धावलेल्या भारतातील स्वयंसेवी संस्थांची मदत नेपाळ सरकारने नाकारली.

भारत-नेपाळमधील ताणलेले संबंध, तेथील बदललेले सरकार आणि २०१५ साली आलेल्या भूकंपानंतरचा अनुभव या कारणांनी तेथील सरकारने भारतीयांना नेपाळमध्ये प्रवेश देण्यास मज्जाव केला आहे. त्यामुळे कोल्हापुरातून मदतीसाठी गेलेली व्हाईट आर्मीचे पथक मंगळवारी भारतात परतले. आपत्तीला तोंड देत असलेल्या देशांना जगभरातून मदतीचे हात येतात पण देशांतर्गत वादांनी माणुसकीची वीणदेखील तोडली आहे.

नेपाळच्या चीन तसेच तिबेट सीमाभागातील रसुला, नवाकोट या भागात सहा दिवसांपूर्वी महाप्रलय आला. त्यात हजारो लोक वाहून गेले क्षणात होत्याचे नव्हते झाले. या नेपाळवासियांच्या मदतीसाठी कोल्हापुरातून व्हाईट आर्मी या आपत्ती व्यवस्थापन संस्थेचे सहा जवान नेपाळला ५ हजार लोकांना पुरतील एवढी औषधे घेऊन गेले. रविवारी रात्री ते रॉकसोल येथील भारत-नेपाळच्या सीमेवर पोहोचले. यामध्ये उज्ज्वल नागेशकर, नितेश वणकुरे, विनायक बट, निखिल लंबू, चालमोन आवळे, अमन धनवडे यांचा समावेश होता.

रविवारी सकाळी ९ वाजता ते नेपाळच्या अधिकाऱ्यांना भेटले. प्राथमिक चर्चा, कागदपत्र पडताळणी झाली तरी दिवसभर त्यांना नेपाळच्या सीमेत येऊ दिले गेले नाही. दुपारी त्यांना भारतीय राजदूतांची परवानगी घेऊन यायला सांगितले. जवानांनी भारतीय राजदूतातील अधिकाऱ्यांना भेटल्यानंतर त्यांनी दिल्लीतून परवानगी आणायची होती असे सांगितले. याच गोंधळात सकाळची सायंकाळ झाली. संध्याकाळी साडे सात वाजता त्यांना नेपाळमध्ये जाण्याची परवानगी मिळाली. गाडी दोनच चेकपोस्ट पास करून पुढे गेली तोपर्यंत त्यांना अडवून त्यांना परत भारताच्या सीमेवर पाठवले गेले. अखेर या पथकाने सीमेवरील भारतीय गोदामात औषधे ठेवली आणि ते मंगळवारी निघून आले.

नवीन सरकारचे धोरण, भारत नेपाळमधील ताणलेले संबंध, २०१५ साली झालेल्या भूकंपानंतर आलेले कटू अनुभव, बाधित झालेला भाग कमी असून या आपत्तीत नेपाळमधील आपत्ती व्यवस्थापन चांगल्या रीतीने काम करत आहे, अन्य देशांच्या मदतीची गरज नाही अशी भावना.

नेपाळमध्ये अनेक भारतीय पर्यटक बेपत्ता आहेत. त्यांची ओळख पटवण्यासाठी तरी नेपाळमध्ये प्रवेश द्या, मृतदेहांची ओळख पटवून भारतातील नातेवाईकांना त्यांच्याबद्दल कळवता येईल अशी अपेक्षा होती. पण त्यालादेखील नकार दिला गेला. नेपाळवासियांच्या मदतीसाठी आम्ही गेलो होतो. पण त्यांना भारतीयांची मदत नको आहे. पूर्ण एक दिवस तेथील सुरक्षा अधिकारी, सरकारशी संवाद साधून नेपाळमध्ये प्रवेश मिळावा यासाठी प्रयत्न केले पण यश आले नाही.

# शिवसेना कुणाची? पुन्हा तारीख!

**नवी दिल्ली । वीरभूमी-**

शिंदे गटाचे वकील नीरज कौल यांनी शिवसेनेत फूट का पडली? याचे कारणच आज कोर्टाला सांगितले. यावेळी त्यांनी पहिल्याच युक्तिवादात काँग्रेस आणि भाजपचा उल्लेख केला. भाजपसोबत युती करून विधानसभेची निवडणूक लढली गेली. निकाल आल्यानंतर ज्यांच्या विरोधात निवडणूक लढली त्यांच्यासोबत आघाडी करून सत्ता स्थापन करण्यात आली. त्यामुळे पक्षात असंतोष होता आणि त्यातूनच पक्षात उठाव झाला, असा युक्तिवाद शिंदे गटाचे वकील नीरज कौल यांनी केला. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर कौल यांनी युक्तिवाद केला.

निवडणुका भाजप सोबत लढल्या मात्र नंतर वेगळे होण्याचा निर्णय घेतला गेला.

### पुढील सुनावणी १५ सप्टेंबर रोजी

पुढील सुनावणी १५ सप्टेंबरला होणार आहे. आजच्या सुनावणीत कौल यांनी पक्षाची फूट, पक्षाची घटना आणि पक्षातील मनमानी त्यातून झालेला उठाव आदी मुद्द्यांवर प्रकाश टाकला. पुढच्या सुनावणीत कौल हे अपात्रता, विधानसभा अध्यक्षांचा निर्णय आणि निवडणूक आयोगाचे आधार तसेच राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष यावर युक्तिवाद करण्याची शक्यता आहे.

ज्यांच्याविरुद्ध निवडणुका लढवल्या त्यांच्यासोबत नंतर युती केली गेली. त्यामुळे पक्षातून उठाव झाला. ठाकरे काँग्रेससोबत गेले म्हणून पक्षात असंतोष होता हीच आमची भूमिका आहे असे वकील नीरज कौल म्हणाले.

विचारसरणी आणि विरोधी पक्षाच्या युतीमुळे पक्षात फूट पडली, असे सांगतानाच आमचीच मूळ शिवसेना असल्याचा दावा त्यांनी केला. तसेच विधीमंडळ पक्ष आणि राजकीय पक्ष एकच असल्याचा दावाही कौल यांनी आजच्या सुनावणीवेळी केला.

ठाकरेंचा युक्तिवादच चुकीच्या मुद्द्यांवर आधारे करण्यात आला आहे. बाळासाहेबांच्या निधनानंतर पक्षात अचानक बदल केले गेले. पक्षाची रचना एका व्यक्तीच्या मर्जीनं झाली होती. एका सहीनं जर जबाबदारी मिळत असेल तर कार्यकर्त्यांचे महत्त्व काय? असा सवाल करतानाच जर तुम्ही पक्षात लोकशाही मार्गाने निवडणूक घेऊ शकत नसाल तर तुम्ही राजकीय पक्ष काय चालवाल? निवडणुका कशा लढाल? पक्षांतर्गत निवडणुका घेतल्याचं पाहिजेत, असा युक्तिवादही त्यांनी केला.

# दिशा सालियन मृत्यू प्रकरणाचा तपास सीबीआयकडे

**मुंबई । वीरभूमी-**

अभिनेता सुशांतसिंह राजपूतची माजी मॅनेजर दिशा सालियन हिच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाचा तपास केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) वर्ग करण्याचे महत्त्वपूर्ण आदेश मुंबई उच्च न्यायालयाने आज (दि. २ सप्टेंबर) दिले. आता या प्रकरणाचा पूर्ण तपास आता केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडून केला जाणार असून, न्यायालयाने या संदर्भात एफआयआर नोंदवण्याचे स्पष्ट निर्देश सीबीआयला दिले आहेत. यासोबतच, आतापर्यंत या प्रकरणाशी संबंधित असलेली मालवणी पोलिस ठाण्यातील सर्व कागदपत्रे आणि पुरावे तात्काळ सीबीआयकडे सोपवण्याचे आदेशही उच्च न्यायालयाने दिले आहेत. या प्रकरणी दिशाचे वडील सतीश सालियन यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

जून २०२० मध्ये मालाड येथील १४ व्या मजल्यावरून पडून दिशाचा मृत्यू झाला होता. दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांचे वकील निलेश ओझा यांनी न्यायालयाच्या निर्णयानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना याविषयी सविस्तर माहिती दिली. सीबीआयने दिशाचे वडील सतीश सालियन यांचा सविस्तर जबाब नोंदवावा, यानुसार एफआयआर दाखल करावा आणि या तपासासाठी एका वरिष्ठ अधिका-याची नियुक्ती करावी, असे निर्देश न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्या खंडपीठाने दिले असल्याचे ॲड. ओझा यांनी सांगितले.

या प्रकरणी ज्यांच्याविरुद्ध ठोस पुरावे मिळतील त्यांच्यावरच कायदेशीर कारवाई केली जाईल. ज्यांच्याविरुद्ध पुरावे नाहीत, त्यांना निष्कारण आरोपी म्हणून गोवले जाणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. तपासाअंती जर सीबीआयने 'नकारात्मक अहवाल' सादर केला, तर त्यावर आक्षेप घेण्याचा आणि 'प्रोटेस्ट पिटिशन' दाखल करण्याचा अधिकार आम्हाला राहील, असा स्पष्ट उल्लेख न्यायालयाने आपल्या आदेशात केला आहे.

याचिकाकर्त्यांचे वकील निलेश ओझा यांनी दावा केला की, दिशावर सामूहिक बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली होती. घटनेनंतर पाच वर्षांनी आणि न्यायालयात धाव घेतल्यानंतरच पोलिसांकडून शवविच्छेदन अहवाल मिळाला. तसेच, याचिकाकर्त्यांनी शिवसेना (उबाठा) नेते आदित्य ठाकरे आणि इतरांवर संशय व्यक्त करूनही पोलिसांनी एफआयआर का नोंदवला नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

# चंद्रपुरात आश्रमशाळेच्या ३१ विद्यार्थ्यांना विषबाधा

**चंद्रपूर । वीरभूमी-**

जिल्ह्याच्या जिवती तालुक्यातील नगराळा येथील श्री अम्बू नाईक माध्यमिक आश्रमशाळेतील तब्बल ३१ विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याचा धक्कादायक प्रकार मंगळवारी (१ सप्टेंबर) सकाळी दहाच्या सुमारास उघडकीस आला. सकाळच्या जेवणादरम्यान काही विद्यार्थ्यांना अचानक उलट्या सुरू झाल्याने आश्रमशाळेत एकच खळबळ उडाली. जेवण तयार करताना पाल शिजल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला.

बहुजन कल्याण विभागाच्या अंतर्गत ही व्हीजेएनटीची आश्रमशाळा १९९४ पासून कार्यरत आहे. येथे माध्यमिकचे १६० विद्यार्थी तर प्राथमिकचे ६८ विद्यार्थी (३४ मुले व ३४ मुली) येथे राहतात. हे सर्व विद्यार्थी नेहमीप्रमाणे सकाळी ९:३० वाजता जेवण करत असताना काही मुलांना अचानक उलट्या सुरू झाल्या. जेवणातून विषबाधा झाली असावी, असा अंदाज बांधून इतर विद्यार्थ्यांनी जेवण करणे टाळले.

# गणेशोत्सवात यंदा पुण्यात लेझर लाईटवर बंदी

**पुणे । वीरभूमी-**

देशभरात गणेशोत्सवाची जय्यत तयारी सुरू असून पुण्यातील सांस्कृतिक, पारंपरिक गणपती उत्सवासाठी येथील मंडळे सज्ज झाली आहेत. मात्र, यंदाही पुण्यातील गणेशोत्सवाच्या अनुषंगाने डीजे, ध्वनीक्षेपक आणि लेझर लाईट, धांगडधिंगा हा प्रश्न प्रामुख्याने समोर आला आहे. त्यातच आज पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी पुण्यात गणेशोत्सव काळात लेझर लाईटला बंदी राहणार असून, ध्वनिप्रदूषणाचे नियम न पाळल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल केला जाईल, असा इशाराही जिल्हाधिका-यांनी दिला. त्यामुळे यंदा धांगडधिंग्याला काही अंशी का होईना रोखण्यास मदत होणार आहे.

पुण्यातील नागरिक विद्यानंद बापट यांनी महापालिकेच्या सर्वसाधारण बैठकीत हा मुद्दा लावून धरला. त्यानंतर त्यांचा व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला असून आता गणेशोत्सवात डीजे बंदी आणि ध्वनी प्रदूषणाविरुद्ध मोहीम सुरू झाल्याचे दिसून येत आहे. पुण्यात विद्यानंद बापट यांनी डीजेमुक्त गणेशोत्सवाचा आग्रह धरला असून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा संदर्भ त्यांनी दिला. त्याच पार्श्वभूमीवर आता अनेक पुणेकरांनी एकत्र येत ध्वनीप्रदूषण आणि वाहतूक रहदारीच्या मुद्यावरून भूमिका मांडली तर जिल्हाधिका-यांनीही कायदेशीर भूमिका मांडली. दरम्यान, लेझर लाईटमुळे भाविकांच्या डोळ्यांवर विपरित परिणाम होत असल्याची बाब समोर आली. त्यामुळे यालाही विरोध होत आहे.

यंदाच्या गणेशोत्सवात पुणे शहरात लेझर लाईटवर बंदी राहणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. तसेच गणेशोत्सव काळात ध्वनी प्रदूषणासंदर्भाने नियमांचे उल्लंघन करणा-यांवर कडक कारवाई होणार, असे स्पष्ट आदेश देण्यात आल्याचेही डुडी यांनी सांगितले. पुण्यात कोर्टाच्या नियमांचे पालन करूनच गणेशोत्सव साजरा होणार आहे. त्यासाठी सर्व गणेश मंडळांसोबत बैठका घेऊन नियमांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे गणेश मंडळांना डीजेबाबत न्यायालयाच्या नियमांचे पालन करावे लागणार आहे,

**सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचे पालन करा**

ध्वनी प्रदूषणाबाबत कोर्टाच्या आदेशांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन डुडी यांनी केले तर नियमांचे उल्लंघन केल्यास गुन्हे दाखल होणार, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी ठणकावले. त्यामुळे लेजर लाईटची चमक कुठेही दिसणार नाही आणि डीजेसारखे ध्वनिप्रदूषणाचे वाद्यही फारसे वाजविले जाण्याची चिन्हे नाहीत. कारण संबंधित मंडळावर गुन्हा दाखल होऊ शकतो.

**मानवाधिकार आयोगाकडे तक्रार**

पुण्यातील ऐतिहासिक गणेशोत्सवातील डीजे आणि कर्णकर्कश ध्वनी प्रदूषणाचा मुद्दा दिवसेंदिवस अधिक तीव्र होताना दिसत आहे. डीजेच्या दणदणाटाविरोधात आतापर्यंत सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट सातत्याने लढा देत असताना आता आणखी एका पुणेकराने या गंभीर प्रश्नावर थेट राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे दरवाजे ठोठावले आहेत.

**आयोगाची प्रदूषण मंडळाला नोटीस**

पुण्यातील डेक्कन जिमखाना परिसरात राहणारे शरद केळकर यांनी पुण्यातील वाढत्या ध्वनी प्रदूषणाबाबत राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडे अधिकृत तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीची अत्यंत गंभीर दखल घेत आयोगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

**नागपुरातही डीजेविरुद्ध जनचळवळ उभारणार**

पुण्यानंतर आता नागपुरातही डीजे बंदीसाठी जनचळवळ उभारण्याची तयारी सुरू झाली.



विधानपरिषदेचे माजी आमदार नागपूरचे माजी महापौर संदीप जोशी यांनी त्यासाठी पुढाकार घेतला. विविध सण आणि उत्सवांत डीजेचा भयानक आवाज त्रासदायक ठरत आहे. त्यामुळे डीजेवर पूर्ण बंदी घातली पाहिजे, असे जोशी म्हणाले.

# SPOT NEWS

## शिवराज्याभिषेक दिनानिमित्त निघोजमध्ये रविवारी भव्य रक्तदान शिबिर

**● निघोज । वीरभूमी –**
शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवबा सोशल फाउंडेशन अंतर्गत शिवबा संघटनेच्या वतीने रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी निघोज येथील मळगंगा मंदिराशेजारी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक उपक्रमाचे हे सातवे वर्ष असून रक्तदान शिबिरात सहभागी होणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास ट्रॅव्हलिंग बॅग भेट देण्यात येणार असल्याची माहिती शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे यांनी दिली. गेल्या सहा वर्षांत ६०० पेक्षा अधिक रक्तदात्यांनी या उपक्रमात सहभागी होत रक्तदान केले आहे. या माध्यमातून आतापर्यंत २८० पेक्षा अधिक गरजू रुग्णांना रक्त उपलब्ध करून देण्यात आले आहे. रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यास गरज भासल्यास रक्तपिशवी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे संघटनेने सांगितले. शिवबा सोशल फाउंडेशन, शिवबा संघटना, शिवबा दुर्गसंवर्धन परिवार, युवा सेना, सर्व मित्र परिवार, ग्रामस्थ तसेच पारनेर तालुका पत्रकार संघ या उपक्रमात सहभागी होणार आहेत. जास्तीत जास्त नागरिकांनी रक्तदान करून सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. रक्तदान शिबिरासाठी राजूभाऊ लाळगे, रविशेठ रणसिंग, गणेश भुकन व निलेश वरखडे यांच्याशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## किशोर दांचा खट्याळपणा, मस्ती अन् एक्सप्रेशन्स; कंचन नेहलानींच्या सादरीकरणाने रंगला मंच!

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
किशोर कुमार म्हटले की त्यांचा खट्याळपणा, मिश्कील हास्य, भन्नाट एक्सप्रेशन्स, अफलातून बॉडी लँग्वेज आणि विनोदी अभिनय डोळ्यांसमोर उभा राहतो. हाच अंदाज आपल्या अभिनयातून हुबेहूब साकारत अहिल्यानगरच्या कंचन नेहलानी यांनी अहमदाबाद आणि कल्याण येथील सलग दोन कार्यक्रमांत रसिकांची मने जिंकली. किशोर कुमार यांच्या व्यक्तिमत्त्वाची अनोखी झलक सादर केल्याबद्दल त्यांचा दोन्ही ठिकाणी विशेष सन्मान करण्यात आला. किशोर कुमार यांच्या गाजलेल्या 'मेरे सामने वाली खिडकी' या गीतावर कंचन नेहलानी यांनी सादर केलेला अभिनय दोन्ही कार्यक्रमांचे प्रमुख आकर्षण ठरले. महिला कलाकाराने किशोर कुमार यांची मस्ती, हावभाव, देहबोली आणि खास अभिनयशैली आत्मसात करून सादरीकरण करण्याची ही कल्पना रसिकांना विशेष भावली. या अनोख्या सादरीकरणाची सुरुवात अहमदाबाद येथे झालेल्या 'हॅप्पी फेस्ट' या कार्यक्रमातून झाली. मिस इंडिया कॉन्टिनेंटल सुमन चैलानी यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या कार्यक्रमात कंचन यांनी किशोर कुमार यांच्या शैलीतील मिश्कील भाव, खट्याळ हालचाली आणि विनोदी अभिनय सादर केला. त्यांच्या प्रत्येक हावभावाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यानंतर कल्याण येथे महाराष्ट्र राज्य सिंधी अकादमी आणि रोशनी कमल फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित 'तीज जश्न' कार्यक्रमातही त्यांनी आपल्या खास अंदाजाची पुनरावृत्ती केली. यावेळी त्यांच्या कॉमिक टाइमिंग, चेहऱ्यावरील हावभाव आणि प्रभावी बॉडी लँग्वेजमुळे कार्यक्रमस्थळी हास्याचे फवारे उडाले. रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांच्या सादरीकरणाला दाद दिली. कंचन यांनी केवळ किशोर कुमार यांची नक्कल न करता त्यांच्या अभिनयातील सहजता, विनोदबुद्धी आणि खट्याळपणा आपल्या शैलीतून साकारला. त्यामुळे हे सादरीकरण एका गीतापुरते मर्यादित न राहता मनोरंजक अभिनयाचा अनुभव ठरले. किशोर कुमार यांच्या अजरामर आठवणींना आपल्या अभिनयातून अनोखे अभिवादन करणाऱ्या कंचन नेहलानी यांचा हा प्रयोग रसिकांच्या विशेष पसंतीस उतरला.

## शिक्षक आमदार किशोर दराडे यांचे अहिल्यानगरमध्ये सोमवारी शिक्षक दरबार

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
अहिल्यानगर जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत नाशिक विभागाचे शिक्षक आमदार किशोर दराडे यांच्या उपस्थितीत शिक्षक दरबार होणार आहे. ही विशेष बैठक सोमवार दि.७ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता जिल्हा परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात पार पडणार आहे. या बैठकीसाठी पुणे विभागीय उपसंचालक यांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याची माहिती त्यांचे स्वीय सहाय्यक हरीष मुंढे व वैभव सांगळे यांनी दिली. या बैठकीस माध्यमिक शिक्षणाधिकारी, वेतन अधीक्षक तसेच लेखाधिकारी शिक्षण विभाग उपस्थित राहणार असून, शिक्षण विभागाशी संबंधित प्रलंबित कामांबाबत थेट चर्चा केली जाणार आहे. जिल्ह्यातील ज्या मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विविध प्रकरणे प्रलंबित असतील त्यांनी आवश्यक कागदपत्रांसह बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच संबंधितांनी आपल्या समस्या, तक्रारी अथवा प्रश्न बैठकीपूर्वी व्हॉट्सपद्वारे पाठवावेत, असेही सांगण्यात आले आहे. स्वीय सहाय्यक हरीष मुंढे यांच्या व्हॉट्सप क्रमांक ७५८८०१४००५ आणि ८२७५५२२५२६ वर प्रश्न पाठविण्याचे सांगण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर सर्व संघटनांच्या पदाधिकारी व शिक्षक सदस्यांनी बैठकीस उपस्थित राहून विविध प्रश्न मांडावेत, असे आमदार दराडे यांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. या बैठकीमुळे शिक्षण विभागातील रखडलेली प्रकरणे, वेतन, सेवा विषयक अडचणी तसेच प्रशासकीय प्रश्न मार्गी लावण्याचे काम केले जाणार आहे.

# लौकीच्या उपसरपंचपदी काळे गटाच्या दीपाली खटकाळे विजयी

### रिक्त पदासाठी निवडणूक प्रक्रिया । सरपंचाच्या निर्णयाक मताने खटकाळे यांचा विजय



**● कोपरगाव । वीरभूमी –**
कोपरगाव तालुक्यातील लौकी ग्रामपंचायतीचे विद्यमान उपसरपंच किरण शेळके यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपसरपंचपदासाठी नुकतीच निवडणूक प्रक्रिया पार पडली. पार पडलेल्या या निवडणुकीत काळे गटाच्या सौ.दिपाली विष्णू खटकाळे यांचा विजय होऊन त्यांची उपसरपंचपदी निवड झाली आहे.

लौकी ग्रामपंचायतीच्या रिक्त उपसरपंचपदासाठीची निवडणूक प्रक्रिया सरपंच आजिनाथ खटकाळे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. उपसरपंचपदासाठीच्या निवडणुकीत काळे गटाकडून सौ.दिपाली विष्णू खटकाळे व कोल्हे गटाकडून भीमाबाई बाबासाहेब खटकाळे यांचे अर्ज दाखल होवून पार पडलेल्या निवडणुकीत दोन्ही उमेदवारांना समसमान चार मते पडली असता. सरपंचाचे निर्णायक मत सौ. दिपाली विष्णू खटकाळे यांच्या पारड्यात पडल्यामुळे निवडणूक अधिकारी काम पाहत असलेले ग्रामसेवक संकेत शिंगाडे यांनी सौ. दिपाली खटकाळे यांचा विजय झाल्याचे जाहीर केले.

आपल्या विजयाबद्दल प्रतिक्रिया देतांना सौ. दिपाली खटकाळे म्हणाल्या की, अटीतटीच्या उपसरपंच पदाच्या निवडणुकीत मिळालेल्या विजयाचा आंनद निश्चितपणे मोठा असला तरी उपसरपंचपदाची जबाबदारी माझ्यावर सोपवून आ.आशुतोष काळे यांनी माझ्यावर जो विश्वास व्यक्त केला आहे, तो माझ्यासाठी केवळ पदाची संधी नसून काम करण्याची मोठी जबाबदारी आहे. माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्तीवर विश्वास दाखवून उपसरपंचपदावर काम करण्याची संधी दिल्याबद्दल आ.आशुतोष काळे यांची मी मनापासून ऋणी आहे. काळे कुटुंबीयांनी आणि आ. आशुतोष काळे यांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास हीच माझी कामाची प्रेरणा राहील. या विश्वासाला कधीही तडा जाऊ न देता सरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने लौकी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम करणार आहे. गावकऱ्यांच्या अपेक्षा पूर्ण करून माझ्यावर सोपविलेली जबाबदारी सार्थ ठरविण्यासाठी पूर्ण क्षमतेने प्रयत्न करेन, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नवनिर्वाचित उपसरपंच सौ. दिपाली खटकाळे यांचे मा.आ.अशोकराव काळे व आ. आशुतोष काळे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी सरपंच, सर्व सदस्य व काळे गटाचे कार्यकर्ते यांनी नवनिर्वाचित उपसरपंच सौ. दिपाली खटकाळे यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सरपंच आजिनाथ खटकाळे, मावळते उपसरपंच किरण शेळके, सर्व ग्रा.प.सदस्य, राहुल खंडीझोड, ललिता इंगळे, राजेंद्र खिलारी, माधव खटकाळे, दिगंबर जाधव, सावळीराम खटकाळे, बाळासाहेब भवर, यशवंत कदम, सागर खटकाळे, दादासाहेब खटकाळे, सचिन खटकाळे, उद्धव खटकाळे, शरद भवर, अनिल भवर, किसनदेव भवर, भाऊसाहेब गोडसे, ज्ञानदेव खटकाळे, पोपट खंडीझोड, सतीष खटकाळे, शंकर खटकाळे, संदीप भवर, राजेंद्र इंगळे, आसाराम इंगळे, संदीप खटकाळे, विष्णू खटकाळे, केरू इंगळे, नारायण इंगळे, सुनिल खटकाळे, भगवान खटकाळे आदी मान्यवरांसह काळे गटाचे कार्यकर्ते व लौकी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राज्य पत्रकार संघ व साई देवा प्रतिष्ठानच्यावतीने घेण्यात आलेल्या एसटी स्मार्ट कार्ड शिबिराचा शेकडो नागरिकांना लाभ



**● कोपरगाव । वीरभूमी –**
नागरिकांना एसटी प्रवासातील सवलतींचा लाभ सहज मिळावा, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई शाखा कोपरगाव आणि साई देवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने 'एनसीएमसी एसटी स्मार्ट कार्ड' काढण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन बुधवारी (दि. २ सप्टेंबर) बाबा चौक, कोपरगाव येथे करण्यात आले. या शिबिराचा शहरातील १०० हून अधिक महिला-पुरुष नागरिकांनी लाभ घेतला.

शिबिराचा प्रारंभ पत्रकार संघाचे जिल्हा सरचिटणीस जनार्दन जगताप व साई देवा प्रतिष्ठानचे सर्वेसर्वा दिपक वाजे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेवक आकाश वाजे यांच्या हस्ते व संघटनेचे तालुका अध्यक्ष विजय कापसे यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

यावेळी तालुका उपाध्यक्ष निवृत्ती शिंदे, कार्याध्यक्ष किसन पवार, सचिव विनोद जवरे, शहर अध्यक्ष हाफिज शेख, उपाध्यक्ष रवी वाघडकर, कार्याध्यक्ष स्वप्निल कोपरे, संघटक सोमनाथ डफळ व संजय लाड, खजिनदार अमोल गायकवाड, प्रसिद्धीप्रमुख विशाल लोंढे, सल्लागार काका खर्डे व दिनेश जोशी, संपर्कप्रमुख राजेंद्र तासकर यांच्यासह फकीरराव टेके, कचरू लोहकरे, सतीश जाधव, मिलिंद विघे, प्रमोद पवार, अक्षय काळे आदी पत्रकार तसेच साई देवा प्रतिष्ठानचे शुभम पेकले,

आकाश अंभोरे, साईनाथ त्रिभुवन, आभास भाई, संकेत मंडलिक, चिराग मोर, प्रशिक भातनकर, ऋषिकेश विश्वकर्मा, जय ढाकणे, प्रसाद भोसले, अतुल गुंजाळ आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्याध्यक्ष किसन पवार यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनाच्या अमृत ज्येष्ठ नागरिक योजनेअंतर्गत ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना १०० टक्के, तर ६५ वर्षांवरील ज्येष्ठांना ५० टक्के तिकीट सवलत मिळते. तसेच महिला सन्मान योजनेअंतर्गत महिलांना ५० टक्के तिकीट सवलत मिळत असल्याचे सांगितले.

कोपरगाव नगरपालिकेचे नगरसेवक आकाश वाजे यांनी या शिबिराचा जास्तीत जास्त पात्र नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन करत अतिशय महत्वाचा असा सामाजिक उपक्रम राबविल्याबद्दल महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व साई देवा प्रतिष्ठान आणि स्मार्ट कार्ड सेंटर चालक सोमनाथ डफाळ यांचे आभार मानले.

## निवृत्त ज्येष्ठ वीज कर्मचारी-अधिकाऱ्यांचा अहिल्यानगरमध्ये स्नेहमेळावा उत्साहात



**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
महाराष्ट्र राज्य वीज मंडळात प्रदीर्घकाळ सेवा बजावून निवृत्त झालेल्या ज्येष्ठ कर्मचारी, कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांचा स्नेहमेळावा महाराष्ट्र वीज कामगार महासंघाच्या वतीने अहिल्यादेवी नगर येथील हॉटेल यश ग्रँड येथे उत्साहात आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पदाधिकारी रविंद्र डबीर होते. यावेळी जुन्या सहकाऱ्यांनी एकत्र येत सेवाकाळातील आठवणींना उजाळा दिला.

वीज उद्योगाच्या विकासात महासंघाच्या निवृत्त सभासदांचे योगदान मोलाचे आहे. त्यांच्या अनुभवाचा व मार्गदर्शनाचा लाभ आजच्या पिढीतील कर्मचारी, पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांना व्हावा, यासाठी अशा स्नेहमेळाव्यांचे आयोजन आवश्यक आहे, असे प्रतिपादन महासंघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक विलास झोडगेकर यांनी केले.

मेळाव्यात निवृत्त सभासदांच्या विविध समस्या, पेन्शन, वैद्यकीय सुविधा, कल्याणकारी योजना तसेच निवृत्तीनंतरच्या सामाजिक जीवनाबाबत चर्चा करण्यात आली. अनेक वर्षांनंतर सहकाऱ्यांची भेट झाल्याने उपस्थितांमध्ये आनंदाचे वातावरण होते.

यावेळी ज्येष्ठ कर्मचारी व पदाधिकारी रविंद्र डबीर, पद्माकर कुलकर्णी, आसाराम घुले, बद्रीनाथ डागा आणि प्रकाश कुलकर्णी यांचा सत्कार करून त्यांच्या प्रदीर्घ सेवेचा गौरव करण्यात आला. सेवानिवृत्ती ही सेवेला पूर्णविराम नसून, अनुभवाच्या माध्यमातून समाजाला योगदान देण्याची नवी सुरुवात आहे, असा संदेश महासंघाचे वित्त प्रभारी रविंद्र काडके यांनी दिला.

कार्यक्रमास महासंघाचे पदाधिकारी, निवृत्त कर्मचारी सुभाष लोंढे, सुधीर दीक्षित, राजेंद्र कुलकर्णी, सुभाष जगदाळे, अनिल चारणे यांच्यासह वीज क्षेत्रातील माजी सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत धर्माधिकारी यांनी केले.

स्नेहमेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी महासंघाचे झोन अध्यक्ष राजेंद्र क्षीरसागर, सचिव गणेश कुंभारे, राहुल वरघंटे, अमोल आभाळे तसेच वीज कामगार पतसंस्थेचे अध्यक्ष प्रदीप भाटे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# रक्षाबंधन पवित्रता आणि आत्मिक शक्तीची आठवण

### राजेश्वरी दीदी । पारनेरमध्ये ब्रह्माकुमारी सेंटरचा आध्यात्मिक कार्यक्रम; राजयोग मेडिटेशनचा संदेश

**● पारनेर । वीरभूमी –**
प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, पारनेर सेंटरच्या वतीने रक्षाबंधन पर्वानिमित्त आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. रक्षाबंधनाच्या माध्यमातून पवित्रता, शुद्ध विचार, आत्मिक शक्ती आणि राजयोग मेडिटेशनचा संदेश उपस्थितांपर्यंत पोहोचविण्यात आला.

कार्यक्रमास ब्रह्माकुमारी राजेश्वरी दीदी, सुषमा दीदी, साधना दीदी, प्रतिमा माताजी, पत्रकार दत्ता गाडगे, उद्योजक संभाजी मगर, स्नेहालय संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते भगवान गायकवाड यांच्यासह लताबाई खोडदे, मनीषा मगर, शारदा खोडदे, गजराबाई औटी, देवराम ढोले, जबाजी खोडदे, रामभाई, गौरी देवी, अरुणा औटी आदी उपस्थित होते.

प्रारंभी ब्रह्माकुमारी साधना दीदी यांनी प्रास्ताविक केले. पारनेर सेंटरच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध आध्यात्मिक उपक्रमांची माहिती देत त्यांनी नियमित राजयोग मेडिटेशनमुळे मनाची एकाग्रता, सकारात्मक विचार आणि आत्मिक शांती वाढण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

ब्रह्माकुमारी राजेश्वरी दीदी म्हणाल्या की, ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या माध्यमातून विविध तालुक्यांमध्ये राजयोग मेडिटेशनचा संदेश दिला जात आहे. स्थानिक बहिणींच्या सहकार्याने नागरिकांना परमात्म्याचा संदेश आणि बाबांच्या मुरलीतील आध्यात्मिक विचारांची माहिती दिली जाते. समाजातील विविध घटकांना राखी बांधून पवित्रता व राजयोगाचा संदेश देण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे.

सध्याचा काळ आव्हानात्मक असून या परिस्थितीत प्रत्येकाने स्वतःमधील सकारात्मकता वाढविणे गरजेचे आहे. राजयोग मेडिटेशनमुळे विचार शुद्ध होतात, मनोबल वाढते आणि जीवनात सुख-शांतीचा अनुभव घेता येतो, असे त्यांनी सांगितले.



माउंट आबू, राजस्थान येथून आणलेल्या पवित्र राखीच्या माध्यमातून साधकांना जीवनातील पवित्रता व शुद्धतेची आठवण करून देण्यात आली. 'आपण सर्वजण एका ईश्वरीय कुटुंबाचा भाग आहोत', या भावनेतून उपस्थितांना प्रेम, शांती आणि परमात्मस्मृतीचा संदेश देण्यात आला. त्यामुळे रक्षाबंधनाच्या पारंपरिक सणाला आध्यात्मिक व सकारात्मक विचारांची जोड मिळाली.

# अगस्ती विद्यालयात विद्यार्थ्यांनी साकारल्या गणेशमूर्ती



### 'गणपती बनवा' कार्यशाळेतून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश

**● अकोले । वीरभूमी –**
गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देतानाच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी अगस्ती विद्यालय, अकोले येथे 'गणपती बनवा' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात असंख्य विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत माती व पर्यावरणपूरक साहित्यापासून आकर्षक गणेशमूर्ती साकारल्या.

कला शिक्षक निशांत बिबवे व श्रीओम सहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना गणेशमूर्तीची संकल्पना, आकार, रचना, सुबकता, कलात्मक बारकावे आणि रंगसंगती याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पनाशक्तीचा वापर करून विविध आकर्षक मूर्ती तयार केल्या.

कार्यशाळेतून केवळ मूर्तीनिर्मितीचे कौशल्य शिकविण्यात आले नाही, तर पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे महत्त्वही विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. पर्यावरणाला हानी पोहोचविणाऱ्या घटकांऐवजी नैसर्गिक व पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करण्याचा संदेश देण्यात आला.

स्वतःच्या हाताने गणेशमूर्ती साकारताना विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या कल्पनेनुसार मूर्तीला वेगळे रूप देण्याचा प्रयत्न केल्याने कार्यशाळेचे वातावरण उत्साहपूर्ण व कलामय झाले होते.

अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे आवश्यक असून, अशा कृतीशील उपक्रमांमुळे सर्जनशीलता, कल्पनाशक्ती, एकाग्रता, हस्तकौशल्य आणि सौंदर्यदृष्टी विकसित होण्यास मदत होते. 'गणपती बनवा' कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून शिकण्याची संधी मिळाली.

विद्यार्थ्यांनी साकारलेल्या गणेशमूर्तींमधून त्यांच्या कल्पकतेचा व कलात्मक कौशल्याचा सुंदर प्रत्यय आला. अगस्ती विद्यालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सेक्रेटरी शैलजा पोखरकर, कार्यवाहक शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी, संदीप नाईकवाडी, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष दत्ता नवले, प्रकाश साळवे, दौलत कानवडे, मुख्याध्यापक संजय शिंदे, उपमुख्याध्यापक तात्यासाहेब दौंड, पर्यवेक्षक नंदा गोपाळे, पालक, शिक्षक व शिक्षणप्रेमींनी कौतुक केले.

निशांत बिबवे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळण्यासोबतच 'पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करूया' हा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.

# SPOT NEWS

## मतमाऊली हरेगाव यात्रेसाठी नगरमधून १० सप्टेंबरला भव्य पदयात्रा

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

सालाबादप्रमाणे यंदाही मतमाऊली हरेगाव यात्रेनिमित्त अहिल्यानगर शहरातून मोठ्या संख्येने भाविक पदयात्रेने हरेगाव (ता. श्रीरामपूर) येथे जाणार आहेत. गुरुवार, दि. १० सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजता बोल्हेगाव येथून या भव्य पदयात्रेचे प्रस्थान होणार असून, शुक्रवार दि. ११ सप्टेंबर रोजी राहुरी येथून श्रीरामपूरच्या दिशेने पदयात्रा पुढे मार्गस्थ होणार आहे. शनिवार दि. १२ सप्टेंबर रोजी हरेगाव वेस ते चर्च अशी मिरवणूक काढण्यात येणार आहे. दि. १२ व १३ सप्टेंबर रोजी मतमाऊली यात्रा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडणार असल्याची माहिती पद यात्रेचे प्रमुख प्रा. पंकज लोखंडे यांनी दिली. ख्रिस्ती धर्मगुरू येशू संधिय, डायसेस, रेव्ह. आबा वाघमारे, रेव्ह. प्रकाश राऊत, रेव्ह. संपत भोसले यांच्या आशीर्वादाने मतमाऊली पदयात्रा कमिटीच्या वतीने या यात्रेला प्रारंभ होणार आहे. श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक एकतेचा संदेश देणाऱ्या या पदयात्रेत अहिल्यानगर शहरासह परिसरातील मोठ्या संख्येने ख्रिस्ती समाजबांधवांसह इतर समाजबांधव देखील सहभागी होणार आहे. ही पदयात्रा आमदार संग्राम जगताप, नगरसेवक कुमारसिंह वाकळे, नगरसेवक सुरेश बनसोडे, माजी पोलिस निरिक्षक सुहासकुमार देठे, पा. प्रशांत चक्रनारायण, पा. अनिल कसबे, कार्यवाहक अभिमन्यु साळवे व राजेश फुलपगार, यात्रा कमिटीचे अध्यक्ष जॉन्सन लोखंडे, उपाध्यक्ष विशाल गायकवाड, सचिव राजू डोईफोडे, सहसचिव बाळासाहेब पाटोळे, कार्याध्यक्ष अमित लोखंडे, सहकार्याध्यक्ष निलेश साळवे, संघटक सनी भाकरे, सदस्य शरद वाकडे, अनिल डोईफोडे, जुबेर सय्यद, महादेव माने यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली आहे. पदयात्रेचे संपूर्ण नियोजन प्रा. पंकज लोखंडे पाहत आहेत. पदयात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी नितिन साठे, सूदाम साळवे, मयूर साळवे, निलेश चक्रनारायण, प्रफुल्ल लोखंडे, प्रेशित चक्रनारायण, गौरव वाकडे, जॉकीन गायकवाड, राजेंद्र भोसले, दिलशाद अन्सारी, मंगेश घोडेकर, संतोष वाघ, जावेद सय्यद, शुभम डोईफोडे, तैमूर सय्यद आदी परिश्रम घेत आहेत. महिला कमिटीच्या माध्यमातूनही पदयात्रेच्या नियोजनात महत्त्वाची भूमिका बजावली जात आहे. महिला कमिटीच्या अध्यक्ष सौ. प्राजक्ता लोखंडे, सचिव कविता डोईफोडे, उपाध्यक्ष रिटा घोडेकर, क्लेरा लोखंडे तसेच पा. लता कसबे, प्रियंका साळवे, जयश्री गायकवाड, ज्योती साठे, अनिता लोखंडे, पूजा डोईफोडे, प्रांजली लोखंडे, शुभांगी डोईफोडे, शारदा गायकवाड, मनीषा चक्रनारायण, सारिका शिरसाठ, ईश्वरी चक्रनारायण, सारा गायकवाड, पुजा लोखंडे, सान्वी लोखंडे, साईश घोडेकर, निलोफर सय्यद, मुस्तफा सय्यद, आयान सय्यद आदी नियोजनात सक्रिय आहेत. स्व मधूकर खंडूजी लोखंडे (गुरुजी), प्रतिष्ठानचे राजेंद्र लोखंडे, रमेश लोखंडे, जॉर्ज लोखंडे, प्रशांत लोखंडे हे देखील पदयात्रेच्या यशस्वीतेसाठी काम पाहत आहेत. मतमाऊली यात्रेच्या निमित्ताने निघणारी ही पदयात्रा श्रद्धा, भक्ती आणि समाजबांधवांमधील एकात्मतेचे प्रतीक ठरणार आहे. पदयात्रेच्या मार्गातील व्यवस्था, भाविकांची सोय आणि विविध नियोजनासाठी आयोजकांकडून तयारी करण्यात येत आहे. अहिल्यानगर शहर व परिसरातील सर्व समाजबांधवांना मोठ्या संख्येने या पदयात्रेत सहभागी होऊन मतमाऊली यात्रेचे सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## अहिल्यानगरमध्ये रविवारी विविध क्षेत्रातील गुणवंतांचा गौरव सोहळ्याचे आयोजन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

चर्मकार विकास संघ अहिल्यानगर, रविदासिया फाउंडेशन मुंबई व लोकनेते मा. आमदार सितारामजी घनदाट (मामा) सामाजिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील चर्मकार समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत, आदर्श शिक्षक व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा रविवारी (दि. ६ सप्टेंबर) आयोजित करण्यात आला आहे. या गुणगौरव सोहळ्यात रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमात खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या हस्ते गुणगौरव सोहळा पार पडणार आहे. या कार्यक्रमास आमदार काशिनाथ दाते, संदीपदादा घनदाट, ज्येष्ठ साहित्यिक संजय कळमकर, तुकाराम शेंडे, चर्मकार विकास संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर, प्रा. सुभाष चिंधे, सुभाष मराठे, ज्ञानदेव पांडुळे, नगरसेवक सुरेश बनसोडे, डॉ. सागर बोरुडे, सुनिल त्र्यंबके, मयुर बांगरे आदी उपस्थित राहणार आहेत. या गुणगौरव सोहळ्याच्या माध्यमातून जिल्ह्यातील चर्मकार समाज एकवटणार आहे. सकाळी १० वाजता शहरातील टिळक रोडवरील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे हा सोहळा होणार असून, यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन गुणगौरव समितीचे संतोष कानडे, सुरेश शेवाळे, सुभाष सोनवणे, अरुण गाडेकर, विनोद कांबळे व रुपेश लोखंडे यांनी केले आहे. गुणगौरव सोहळ्याचे हे पंधरावे वर्ष आहे. या कार्यक्रमात इयत्ता १० वी व १२ वी उत्तीर्ण विद्यार्थी, पदवीधर, अभियंते, डॉक्टर, प्रशासकीय अधिकारी, एमपीएससी-यूपीएससी व इतर स्पर्धा परीक्षेत यश मिळवलेले विद्यार्थी, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे युवक-युवती तसेच आदर्श शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे. यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी व समाजबांधवांनी आपले मार्कशीट, जातीचा दाखला, पासपोर्ट साईज फोटो तसेच संबंधित कागदपत्रे दोन दिवसांत तालुका प्रतिनिधीकडे जमा करावे. गुणगौरव सोहळ्यात समाजबांधवांनी सहपरिवार उपस्थित राहून गुणवंतांचा सन्मान सोहळा मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# राजूर अप्पर तहसीलमध्ये कोतुळचा समावेश नको

### गाव बंद ठेवत ग्रामस्थांचा तीव्र विरोध; अकोले तहसीलशीच जोडण्याची मागणी

**● अकोले । वीरभूमी –**

प्रस्तावित राजूर अप्पर तहसील कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात कोतुळ गावाचा समावेश करण्यास ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. चार दिवसांपूर्वी झालेल्या ग्रामसभेत याबाबत विरोधाचा ठराव मंजूर केल्यानंतर मंगळवारी कोतुळ गाव बंद ठेवून निर्णयाचा निषेध करण्यात आला.

कोतुळ गावाचा राजूर अप्पर तहसील कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात समावेश करू नये, असा ठराव ग्रामसभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आला. त्यानुसार मंगळवारी दुपारपर्यंत गावातील व्यवहार बंद ठेवण्यात आले. त्यानंतर मुख्य चौकात जाहीर सभा घेण्यात आली.

राज्य शासनाने ६९ नवीन अप्पर तहसील कार्यालये निर्माण करण्याबाबत अध्यादेश काढला असून, अकोले तालुक्यासाठी राजूर येथे अप्पर तहसील कार्यालय प्रस्तावित आहे. संबंधित क्षेत्राच्या निर्मितीसाठी हरकती मागविण्यात आल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर कोतुळ ग्रामसभेने राजूर अप्पर तहसीलच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट न होण्याचा



निर्णय घेतला.

जाहीर सभेत सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी बी. जे. देशमुख, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सीताराम पाटील देशमुख, शंकर घोलप व सागर देशमुख यांनी भूमिका मांडली. कोतुळचे सामाजिक सलोखा, दैनंदिन व्यवहार, शैक्षणिक व संस्थात्मक संबंध तसेच दळणवळण अकोले शहराशी जोडलेले असल्याने गावाचा समावेश अकोले तहसील कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातच करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली.

या प्रश्नावर आमदार डॉ. किरण लहामटे यांनी आपली भूमिका माध्यमांसमोर स्पष्ट करावी आणि ग्रामस्थांच्या मागणीसोबत उभे राहावे, अशी मागणी बी. जे. देशमुख व सीताराम पाटील देशमुख यांनी केली.

प्रस्तावित रचनेनुसार राजूर अप्पर तहसील क्षेत्रात राजूर, कोतुळ, साकीरवाडी, वाकी, शेंडी व खिरविरे या मंडळांचा समावेश होण्याची शक्यता आहे. तर अकोले तहसील क्षेत्रात अकोले, ब्राह्मणवाडा, लिंगदेव, विरगाव, समशेरपूर व रुंभोडी ही मंडळे राहणार आहेत. तालुक्यात एकूण १२ मंडळांची रचना प्रस्तावित आहे.

दरम्यान, ग्रामस्थांनी महसूल प्रशासनाचे मंडळ अधिकारी श्री. डगळे यांना सह्यांचे निवेदन देऊन कोतुळचा राजूर अप्पर तहसीलमध्ये समावेश करू नये, अशी मागणी केली.

# विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर एक तास खेळासाठी द्यावा : प्रा. किरण गोरे

### चापडगाव विद्यालयात मेजर ध्यानचंद जयंतीनिमित्त जागतिक क्रीडा दिन साजरा



**● शेवगाव । वीरभूमी –**

आदर्श भारताने अनेक महान खेळाडू घडविले असून, त्यातील बहुतांश खेळाडूंचा उदय खेड्यांमधूनच झाला आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर दररोज एक तास खेळासाठी द्यावा, असे प्रतिपादन प्रा. किरण गोरे यांनी केले.

चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त जागतिक क्रीडा दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रा. गोरे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य संपत दसपुते होते.

प्रा. गोरे म्हणाले की, जिद्द, मेहनत, कष्ट, परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या बळावर कोणतेही यश मिळविता येते. खेळाडूंनी सरावात सातत्य ठेवण्यासोबतच संघभावना जागृत ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास उपप्राचार्य सुनील जायभाये, पर्यवेक्षक संजय दुधाडे, दादासाहेब ज्योतीक, अशोक आघवणे, वत्सला जाधव, विद्यावर्धिनी मुळे, संजय मरकड, शरद सुपारे, गजानन दरंदले, देवेंद्र लांडे, ज्ञानेश्वर आवारे, सुदर्शन गायकवाड, सर्जेराव निकाळजे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सर्जेराव निकाळजे यांनी केले, तर भारत म्हस्के यांनी आभार मानले. क्रीडाशिक्षक सादिक शेख व ज्ञानेश्वर तहकीक यांचा विद्यालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# सुरेखा खाडे यांना जिल्हा परिषदेचा 'आदर्श शिक्षिका' पुरस्कार जाहीर

**● पाथर्डी । वीरभूमी–**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला केंद्रस्थानी ठेवून अध्यापनासोबत विविध उपक्रम राबविणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रांजणी (ता. पाथर्डी) येथील शिक्षिका श्रीमती सुरेखा खाडे यांना जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांच्या वतीने 'आदर्श शिक्षिका पुरस्कार' जाहीर झाला आहे. त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेत मिळालेल्या या सन्मानामुळे रांजणी शाळेसह पाथर्डी तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात आनंद व्यक्त होत आहे.

शिक्षक हा केवळ पुस्तकी ज्ञान देणारा नसून विद्यार्थ्यांना जीवनाची योग्य दिशा देणारा मार्गदर्शक असतो, या भूमिकेतून सुरेखा खाडे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले. अध्यापनासोबत संस्कार, शिस्त, आत्मविश्वास, सर्जनशीलता, सामाजिक जाणीव आणि विविध कौशल्यांच्या विकासावर त्यांनी भर दिला.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात सक्रिय



सहभागी करून घेणे, प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता ओळखून त्याला प्रोत्साहन देणे तसेच शिक्षण आनंददायी व कृतीशील करण्यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबविले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या भावनिक, सामाजिक व व्यक्तिमत्त्व विकासालाही त्यांनी महत्त्व दिले.

'प्रत्येक विद्यार्थी शिकला पाहिजे आणि त्याच्यातील गुणवत्ता फुलली पाहिजे', या भावनेतून काम करताना त्यांनी विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेत आपुलकीचे नाते निर्माण केले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण होण्यासोबतच आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली.

शैक्षणिक कार्यासोबत सामाजिक जाणीव व जबाबदारीची भावना जोपासत शाळा, विद्यार्थी, पालक आणि समाज यांच्यात सकारात्मक संवाद निर्माण करण्यासाठीही त्यांचे योगदान उल्लेखनीय राहिले आहे. त्यांच्या या समर्पित कार्याची दखल घेत जिल्हा परिषदेने केलेला 'आदर्श शिक्षिका' पुरस्कार हा रांजणी शाळेसह पाथर्डी तालुक्यासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

पुरस्कार जाहीर झाल्यानंतर शाळेतील शिक्षकवृंद, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण असून शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक व क्रीडा क्षेत्रातील विविध मान्यवरांकडून सुरेखा खाडे यांचे अभिनंदन होत आहे. हा सन्मान ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण व मूल्याधिष्ठित शिक्षणासाठी कार्यरत शिक्षकांच्या समर्पणाचा गौरव असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# संजीवनी सहकारी पतसंस्थेला ४ कोटी २ लाखांचा नफा; सभासदांना १५ टक्के लाभांश

### ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात । सलग ४२ वर्षे 'अ' ऑडिट वर्गाची परंपरा कायम

**● कोपरगाव । वीरभूमी –**

संजीवनी सहकारी पतसंस्थेने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ४ कोटी २ लाख रुपयांचा नफा मिळवित आर्थिक प्रगतीची घोडदौड कायम ठेवली आहे. संस्थेने सलग ४२ वर्षे 'अ' ऑडिट वर्ग मिळविण्याची परंपरा यंदाही कायम ठेवली असून, सभासदांना १५ टक्के लाभांश देण्यात येणार आहे. माजी मंत्री स्व. शंकररावजी कोल्हे साहेब यांनी संस्थापक म्हणून उभारलेल्या संजीवनी उद्योग समूहातील या पतसंस्थेची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, दि. १ सप्टेंबर २०२६ रोजी सहजानंदनगर येथे उत्साहात संपन्न झाली.

सभेत उपस्थितांना प्रमुख मार्गदर्शन करताना संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे म्हणाले की, गेल्या चार-पाच वर्षांत सहकार क्षेत्रासमोर अनेक संकटे उभी राहिली. कोरोना महामारी, आर्थिक मंदी, दुष्काळ आणि महागाईमुळे बाजारपेठेवर परिणाम झाला. वेळेवर पाऊस न झाल्याने शेतकरीही अडचणीत आला. अशा प्रतिकूल परिस्थितीतही संजीवनी सहकारी पतसंस्थेने सभासद आणि जनतेचा विश्वास कायम ठेवत आपली यशस्वी वाटचाल सुरू ठेवली आहे. दुष्काळ, महागाई आणि आर्थिक मंदीचा फटका बाजारपेठेला बसला असतानाही संस्थेने आर्थिक स्थैर्य टिकवून ठेवले, असे त्यांनी सांगितले.

संस्थेचे चेअरमन राजेश परजणे यांनी अध्यक्षीय भाषणात संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा आढावा मांडला. सन २०२५-२६ अखेर संस्थेकडे २०३ कोटी ३९ लाख रुपयांच्या ठेवी असून, १५६ कोटी ८७ लाख रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. तसेच संस्थेची ७५ कोटी ८० लाख रुपयांची गुंतवणूक असून, या आर्थिक वर्षात ४ कोटी २ लाख रुपयांचा नफा झाला आहे. सभासदांना १५ टक्के लाभांश देण्यात येणार असून, सलग ४२ वर्षे 'अ' ऑडिट वर्ग मिळणे ही संस्थेच्या आर्थिक शिस्तीची आणि विश्वासार्हतेची पावती असल्याचे परजणे यांनी सांगितले.

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व्ही. व्ही. रोहमारे यांनी सभेसमोर संस्थेचा वार्षिक अहवाल सादर केला. यावेळी युवा नेते आमदार विवेकभैय्या कोल्हे, संजीवनी एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन नितीनदादा कोल्हे, सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे




व्हाईस चेअरमन ज्ञानेश्वर परजणे यांच्यासह अरुणदादा येवले, शिवाजीराव वक्ते, बाळासाहेब वक्ते, संजयराव होन, आप्पासाहेब दवंगे, केशवराव भवर, राजेंद्र कोळपे, रमेश घोडेराव, त्र्यंबकराव सरोदे, साहेबराव पाटील कदम, विलासराव कुलकर्णी आदी उपस्थित होते.

तसेच साई संजीवनी बँकेचे चेअरमन शरदनाना थोरात, व्हाईस चेअरमन सुरेश जाधव, संस्थेचे आजी-माजी संचालक, पतसंस्थेचे सर्व संचालक, तालुका संघाचे चेअरमन अंबादास पाटील देवकर व त्यांचे सहकारी तसेच संजीवनी सहकारी पतसंस्थेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेच्या शेवटी संस्थेचे चेअरमन राजेश परजणे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# पाथर्डीतील आंबेडकर भवनात महापुरुषांच्या प्रतिमांचे अनावरण

### ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक मोहनराव गाडे यांच्यासह महावीर, डॉ. कलाम व वामनदादा कर्डक यांच्या प्रतिमांचा समावेश

**● पाथर्डी । वीरभूमी –**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनात ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक स्व. मोहनराव गाडे यांच्यासह भगवान महावीर, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम आणि लोकशाहीर वामनदादा कर्डक यांच्या प्रतिमांचे अनावरण उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष प्रा. किसनराव चव्हाण यांच्या हस्ते हा सोहळा पार पडला.

यावेळी प्रा. किसन चव्हाण म्हणाले की, समाजासाठी निस्वार्थपणे कार्य करणाऱ्या व्यक्तीचे कार्य समाज कायम स्मरणात ठेवतो. द्वेषभावना बाजूला ठेवून समाजाने एकत्र येणे आणि विचारांची बैठक घडविणे गरजेचे आहे. चांगले कर्म केल्यास त्याचे चांगले फळ निश्चित मिळते. स्व. मोहनराव गाडे यांची प्रतिमा सभागृहात लावण्यात आल्याने समाजासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान जपण्याची प्रेरणा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी प्रा. किसन चव्हाण यांचा जगदीश गाडे व मंदाकिनी गाडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. महेंद्र राजगुरू यांनी केले, तर वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष श्रीकांत ऊर्फ पप्पूशेठ बोर्डे यांनी आभार मानले.

कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष श्रीपत बळीत, प्रा. संजय राजगुरू, उद्योजक एकनाथ ठोकळ, सेवानिवृत्त तहसीलदार जगदीश गाडे, प्रा. डोळस, दिगंबर गाडे, रोहिणी ठोंबे, संतोष काळोखे, विनोद थोरात यांच्यासह मोठ्या संख्येने धम्म बांधव व भगिनी उपस्थित होते.

यावेळी प्रा. विनोद थोरात यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनावर आणखी एक मजला बांधून तेथे विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरू करण्याचा प्रस्ताव मांडला. त्या अभ्यासिकेत स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी आवश्यक पुस्तके स्वतःच्या वतीने मोफत उपलब्ध करून देण्याची तयारीही त्यांनी दर्शविली.

विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून पुढे जाण्यासाठी चांगली अभ्यासाची सुविधा मिळावी, या उद्देशाने मांडलेल्या या प्रस्तावाचे उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले.



# नगराध्यक्षांच्या नातेवाईकांच्या हस्तक्षेपावर कारवाई करा

## जिल्हाधिकाऱ्यांचे शेवगाव पालिका मुख्याधिकाऱ्यांना निर्देश । फाईल हालचाली, आवक-जावक नोंदी व सीसीटीव्ही तपासण्याचे आदेश

**● शेवगाव । वीरभूमी-** नगरपरिषदेच्या प्रशासकीय कामकाजात नगराध्यक्षांच्या पती अथवा नातेवाईकांकडून कथित अनधिकृत हस्तक्षेप होत असल्याच्या नगरसेवकांच्या तक्रारींची जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी गंभीर दखल घेतली आहे. याप्रकरणी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी विजया घाडगे यांना नियमाप्रमाणे आवश्यक ती कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

नगराध्यक्षांच्या पतीकडून अधिकारी-कर्मचाऱ्यांना अनधिकृत सूचना देणे, नगरपरिषदेचा कारभार हाताळणे, विकासकामांच्या फाईल व अभिलेख कार्यालयाबाहेर नेणे, ठेकेदार व तांत्रिक सल्लागारांवर दबाव आणणे तसेच सर्वसाधारण सभेच्या कामकाजात बाहेरील व्यक्तींचा हस्तक्षेप घडवून आणणे, असे आरोप नगरसेवकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केलेल्या तक्रारीत केले आहेत.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाच्या २० जुलै १९९३ रोजीच्या नगरविकास विभागाच्या परिपत्रकासह महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील संबंधित तरतुदींचा संदर्भ दिला आहे. नगरपरिषदेच्या कार्यालयीन कामकाजात कोणत्याही अनधिकृत व्यक्तीला हस्तक्षेप करण्याचा अधिकार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

नगरपरिषदेतील अभिलेखांची अचानक तपासणी करून फाईल अथवा कागदपत्रे कार्यालयाबाहेर नेण्यात आली आहेत का, याची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यासाठी आवक-जावक नोंदी, फाईल मूव्हमेंट रजिस्टर आणि सीसीटीव्ही फुटेज तपासून अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

तसेच अनधिकृत व्यक्तींच्या सूचना अथवा आदेशांचे पालन करू नये, अशा लेखी सूचना अधिकारी-कर्मचाऱ्यांना देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दबावाखाली काम केल्याचे आढळल्यास संबंधित कर्मचाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

विकासकामांतील ठेकेदार व तांत्रिक सल्लागारांवर अनधिकृत दबाव येणार नाही, याची दक्षता घेण्यासह आगामी सर्वसाधारण सभा व बैठका निर्भय वातावरणात पार पडण्यासाठी आवश्यकतेनुसार पोलिस बंदोबस्त ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशांमुळे या प्रकरणाला गंभीर वळण मिळाले असून, मुख्याधिकारी याप्रकरणी काय कारवाई करतात, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.




### १८ नगरसेवकांच्या तक्रारी

■ नगराध्यक्षांच्या पतीच्या कथित हस्तक्षेपासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडे दोन स्वतंत्र तक्रारी दाखल झाल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे सात, शिवसेनेचे तीन, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे दोन, तर भाजपच्या सहा नगरसेवकांनी या तक्रारी केल्या आहेत.

> माझे पती नगरपरिषदेच्या कामकाजात कोणताही हस्तक्षेप करीत नाहीत. ते मला कार्यालयात सोडण्यासाठी येतात. शहरातील जनतेने आमच्यावर विश्वास टाकल्याने अनेक जण त्रस्त आहेत. जाणूनबुजून आमच्या कुटुंबाला त्रास देण्याचा प्रकार सुरू आहे. मात्र, त्याकडे दुर्लक्ष करून जनतेची कामे करण्यावर माझा भर आहे.
>
> **- माया मुंढे,** नगराध्यक्षा, शेवगाव

> नगरसेवकांच्या तक्रारींची दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश प्राप्त झाले आहेत. यापुढे शहानिशा करून नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
>
> **- विजया घाडगे,** मुख्याधिकारी, शेवगाव

# एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीची ५२ वी राष्ट्रीय अबॅकस स्पर्धा उत्साहात

**● अहिल्यानगर । वीरभूमी -** वेगवान गणिती गणना, विलक्षण एकाग्रता, स्मरणशक्ती आणि आत्मविश्वासाचा अद्भुत संगम अनुभवायला मिळालेल्या एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या ५२ व्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.विविध शहरांमधून आलेल्या तब्बल १,४०० विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे या राष्ट्रीय स्पर्धेला ज्ञानोत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले.

या प्रसंगी श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघाचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भविष्यातील जग हे ज्ञान, तंत्रज्ञान आणि नवसंकल्पनांवर आधारित असणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या शुभहस्ते सरस्वती पूजन, दीपप्रज्वलन आणि अबॅकस मण्यांच्या पाटीचे पूजन करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून पोलीस उपनिरीक्षक सविता काळे, पंचायत समिती सदस्य अमित जाधव, नगरसेवक अमित जाधव, प्राचार्या नीता खामकर, उपमुख्याध्यापिका जयश्री खणसे, बालभारती सदस्य स्वप्निल तांबे, भाजपा अध्यक्ष नितीन नलगे, संस्थापक अशोक कारले, अशोक घडेकर, अबॅकस नवसंशोधनातील जगातील पहिली पीएचडी प्राप्त डॉ. कल्पना घडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

१,४०० विद्यार्थ्यांतून कु. वेदीका शेजाळ हिने आपल्या उत्कृष्ट कामगिरीची छाप उमटवत 'चॅम्पियन ऑफ चॅम्पियन' हा मानाचा किताब पटकावला. तिच्या उल्लेखनीय यशाबद्दल तिला स्मृतिचिन्ह व सुमारे ३,००० चे रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

जिल्हाभरातून सुमारे १,४०० विद्यार्थ्यांनी स्पर्धेत आपले कौशल्य पणाला लावले. या स्पर्धेतून २० विद्यार्थ्यांनी 'चॅम्पियन' होण्याचा बहुमान पटकावला. यामध्ये लहान गट -ईश्वरी बोरुडे, प्रणाली चव्हाण, दिव्या मोरे, राजवर्धन शेडगे, शौर्य मिथे, श्रेयश साळुंखे, आराध्या केसवड, मित कुरुमकर, सर्वेश कोल्हे, दिव्या साळुंखे मोठ्या गटात प्रवीण कावळे, प्रथमेश गरुड, श्रावणी गायकवाड, आराध्या माने, ईश्वरी माने, अन्वय काळे, कल्याणी घनवट, स्वरा गवळी, अर्णव भालके, आर्य साळवे, वृषाली औटी, अपेक्षा जगतकर, विनायक कापसे, शुभेच्छा गायकवाड, श्रावणी पवार यांचा समावेश आहे.

# प्रसिद्ध झालेल्या मतदार याद्या तपासाव्यात; आ. विवेकभैय्या कोल्हे जनसंपर्क कार्यालयाकडून नागरिकांना आवाहन

**● कोपरगाव । वीरभूमी -** विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी विशेष मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रियेंतर्गत प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीत आपले नाव आहे का, तसेच नाव, पत्ता व इतर तपशील अचूक आहेत का, याची तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आ.विवेकभैय्या कोल्हे जनसंपर्क कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.



प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, एसआयआर प्रक्रियेंतर्गत महाराष्ट्राची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.मतदारांनी या यादीत आपले नाव तपासून घ्यावे. नाव आढळून न आल्यास किंवा नोंदीमध्ये काही त्रुटी असल्यास संबंधित मतदारांनी विहित मुदतीत दावा अथवा हरकत नोंदवून आवश्यक ती कार्यवाही करून घ्यावी.दावे व हरकती नोंदविण्याची अंतिम तारीख ३० सप्टेंबर २०२६ आहे.

त्यामुळे कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील नागरिकांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता मतदार यादीची पडताळणी करून घ्यावी. मतदार यादीतील आपली नोंद अचूक असल्याची खात्री करून घेणे आवश्यक असल्याचेही पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

याबाबत नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन बूथस्तरीय अधिकारी, निवडणूक शाखा तसेच आमदार विवेकभैय्या कोल्हे जनसंपर्क कार्यालय, गुरुद्वारा रोड, कोपरगाव येथे मिळणार आहे. अधिक माहितीसाठी ८१८१९०९०९० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील पात्र मतदारांनी एसआयआर प्रक्रियेंतर्गत प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीची तपासणी करून,आवश्यक असल्यास निर्धारित मुदतीत दावा अथवा हरकत नोंदवावी, असे आवाहन प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

# जुन्या पेन्शनसाठी शिक्षक-शिक्षकेतरांचा एलगार; काळ्या फितीने आंदोलनाला सुरुवात

## जुन्या पेन्शनच्या मागणीसाठी शिक्षक आक्रमक । ५ सप्टेंबरला शिक्षक दिनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे

**● अहिल्यानगर । वीरभूमी-** जुन्या पेन्शन योजनेपासून वंचित ठेवण्यात आल्याच्या निषेधार्थ राज्यातील माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचे रणशिंग फुंकले आहे. मंगळवारपासून (ता. १ सप्टेंबर) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती बांधून शासनाच्या धोरणाचा निषेध नोंदविण्यास सुरुवात केली आहे. १ ते ४ सप्टेंबर या कालावधीत काळ्या फिती बांधून नियमित शैक्षणिक कामकाज सुरू ठेवत हे आंदोलन करण्यात येणार आहे.

यानंतर शिक्षक दिनाचे औचित्य साधून ५ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. जुन्या पेन्शन योजनेच्या मागणीबाबत शासनाने अद्याप ठोस निर्णय घेतला नसल्याने आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शासनाने मागणीची दखल घेऊन सकारात्मक निर्णय न घेतल्यास २८ सप्टेंबरपासून मुंबईतील आझाद मैदानावर सहकुटुंब आंदोलन छेडण्यात येईल, तसेच आमरण उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव तथा जुन्या पेन्शन योजना समन्वय संघाचे राज्य समन्वयक महेंद्र हिंगे आणि राज्य समन्वयक सुनील भोर यांनी ही माहिती दिली.

१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शन योजनेचा लाभ मिळावा, ही मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. जुन्या पेन्शन योजनेचा लाभ मिळावा यासाठी संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यापूर्वीही विविध आंदोलने, निवेदने आणि मोर्चांच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, वारंवार आंदोलने करूनही शासनाकडून या प्रश्नावर ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही, असा आरोप जुन्या पेन्शन योजना समन्वय संघाने केला आहे. त्यामुळे आता आंदोलनाचा टप्पा अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात १ ते ४ सप्टेंबरदरम्यान शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी काळ्या फिती बांधून शाळांमध्ये नियमित शैक्षणिक कामकाज पार पाडणार आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, याची काळजी घेत शासनाच्या धोरणाचा निषेध करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. काळ्या फिती हे शासनाच्या धोरणाविरोधातील निषेधाचे प्रतीक म्हणून वापरण्यात येणार असून, या माध्यमातून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागणीकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

आंदोलनाच्या पुढील टप्प्यात ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाच्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. शिक्षकांचा सन्मान करण्याचा दिवस असतानाच आपल्या न्याय्य हक्कासाठी शिक्षकांना आंदोलन करावे लागत असल्याची खंत आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली आहे. या धरणे आंदोलनात जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शासनाने या आंदोलनाची दखल घेऊन जुन्या पेन्शन योजनेबाबत ठोस निर्णय घेतला नाही, तर आंदोलन आणखी तीव्र करण्यात येणार आहे. २८ सप्टेंबरपासून मुंबईतील आझाद मैदानावर सहकुटुंब आंदोलन छेडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचबरोबर मागणी मान्य होईपर्यंत आमरण उपोषण करण्याचा इशाराही संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

जुन्या पेन्शन योजना समन्वय संघाचे राज्य समन्वयक महेंद्र हिंगे म्हणाले की, जुन्या पेन्शन योजनेबाबत शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी आता निर्णायक लढा उभारण्यात येणार आहे. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी जुन्या पेन्शन योजनेपासून वंचित आहेत. या सर्व कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी आंदोलन सुरू करण्यात आले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# शहरात ६ सप्टेंबरला 'मनचाहे गीत' संगीत मैफल

## डॉ. रोहित साने करणार उपस्थितांना मार्गदर्शन । गंभीर आजारांवर मात करणाऱ्यांचा होणार सन्मान

**● अहिल्यानगर । वीरभूमी -** 'ऋणानुबंध' बहुउद्देशीय संस्था व माधवबाग (अहिल्यानगर) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दिनांक ६ सप्टेंबर २०२६ रोजी 'मनचाहे गीत' या सुरेल संगीत मैफलीचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. संगीत साधना हीच उत्तम आरोग्याची गुरुकिल्ली आहे या संकल्पनेवर आधारित या संगीतमय सायंकाळी माधवबाग प्रस्तुत 'विजयोत्सव २०२६' हा प्रेरणादायी सन्मान सोहळा देखील पार पडणार आहे.

हा सोहळा रविवारी सायंकाळी ४:०० वाजता झोपडी कॅन्टीन परिसरातील माऊली सभागृह, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे. अहिल्यानगरमध्ये गेल्या दहा वर्षांपासून डॉ. स्वाती कुमठेकर यांच्या नेतृत्वाखाली माधवबाग क्लिनिक आणि हॉस्पिटल उत्कृष्ट वैद्यकीय सेवा देत आहे. तसेच अजित रोकडे यांच्या अध्यक्षतेखाली 'ऋणानुबंध' संस्था विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे. या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात भारतातील आघाडीच्या हृदयविकार उपचार साखळीचे (माधवबाग) संस्थापक डॉ. रोहित माधव साने हे उपस्थितांना आरोग्यदायी आयुष्याविषयी मोलाचे मार्गदर्शन करणार आहेत. तसेच, जिद्दीने गंभीर आजारांवर मात केलेल्या रुग्णांचा याप्रसंगी विशेष सन्मान करण्यात येणार आहे.



या सोहळ्याला डॉ. रोहित साने यांच्यासोबतच स्नेहालयाच्या अध्यक्षा श्रीमती प्रीती भोंबे, उद्योजक गौरव फिरोदिया, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे गायक पवन नाईक आणि रावसाहेब पटवर्धन स्मारक समितीचे सचिव रवींद्र शितोळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. प्रवेश विनामूल्य असून, पास आवश्यक आहेत. कार्यक्रमाचे प्रवेश पास विनामूल्य उपलब्ध असून, अधिक माहिती व पाससाठी 'श्री स्वामी समर्थ मोबाईल' (महेश घावटे: ७३५०८८१५१५ / ९४२०६३५०९६ / ९८२३८११११९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. स्वाती कुमठेकर, अजित रोकडे, सारिका रघुवंशी, प्रशांत बंडगर व ऋणानुबंध परिवाराने केले आहे.

# तिसगाव येथे महाविद्यालयीन विद्यार्थिनीचा विनयभंग; आरोपीची नागरिकांकडून येथेच्छ धुलाई

**● पाथर्डी । वीरभूमी -** तालुक्यातील तिसगाव येथील १७ वर्षीय महाविद्यालयीन विद्यार्थिनीचा पाठलाग करून तिच्याशी अश्लील हावभाव व गैरवर्तन केल्याच्या आरोपावरून गणेश सचिन शिंदे (वय २०, रा. तिसगाव, ता. पाथर्डी) याच्याविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत विद्यार्थिनीने पोलिसांकडे दिलेल्या फिर्यादीनुसार, ती तिसगाव येथील महाविद्यालयात इयत्ता बारावीचे शिक्षण घेत आहे. दि. २ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी सुमारे चार वाजता महाविद्यालय सुटल्यानंतर ती घरी जात असताना आरोपी गणेश शिंदे तिच्यासमोर येऊन विचित्र हावभाव करू लागला. त्यानंतर त्याने तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न करून, तू खूप आवडतेस, असे म्हटल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

विद्यार्थिनीने त्यास विरोध करून आपल्याला तो प्रकार आवडत नसल्याचे सांगितले. त्यानंतरही संशयिताने तिचा पाठलाग करत पुन्हा तिच्याजवळ येण्याचा प्रयत्न केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. यावेळी विद्यार्थिनीने परिसरातील नागरिकांना सदर प्रकाराची माहिती दिल्यानंतर उपस्थित नागरिकांनी त्याची चांगलीच धुलाई केली.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत संशयित गणेश शिंदे यास ताब्यात घेतले. त्यानंतर त्याला रुग्णवाहिकेतून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या प्रकरणी विद्यार्थिनीच्या फिर्यादीवरून पोलिसांनी संबंधित कायदेशीर तरतुदींनुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

आरोपी तरुण कायमच असे गैरकृत्य महाविद्यालय परिसरात करत होता अनेक विद्यार्थीनींना त्याने त्रास दिला आहे त्यामुळे संतप्त नागरिकांनी त्याची चांगलीच धुलाई केली.

# राजेंद्र सोनवणे यांचे विद्यालयाच्या प्रगतीत मोठे योगदान

## वैभवराव पिचड । सेवापूर्ती सोहळ्यात मुख्याध्यापक सोनवणे यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत गौरव

**● अकोले । वीरभूमी -** अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीच्या विद्यालयांच्या प्रगतीमध्ये मुख्याध्यापक राजेंद्र तुकाराम सोनवणे यांचे मोठे योगदान असल्याचे गौरवोद्गार संस्थेचे कार्यकारी विश्वस्त तथा माजी आमदार वैभवराव पिचड यांनी काढले. मेहेंदुरी येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र सोनवणे यांच्या सेवापूर्ती सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सुनील दातीर होते.

कार्यक्रमास बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपरे, शिक्षक आमदार किशोर दराडे, पदवीधर मतदारसंघाचे माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, जि. प. बांधकाम समितीचे माजी सभापती कैलासराव वाकचौरे, विघ्नहर कारखान्याचे कार्यकारी संचालक भास्करराव घुले, संस्थेचे कायम विश्वस्त गिरजाजी जाधव, विश्वस्त मधुकर सोनवणे, सुरेशराव कोते, सेक्रेटरी सुधाकर देशमुख, स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष रमेशराव जगताप यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सेवापूर्ती सोहळ्यापूर्वी मुख्याध्यापक राजेंद्र सोनवणे यांच्या प्रयत्नांतून विद्यालयाच्या प्रांगणात उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे अनावरण करण्यात आले. तसेच कै. देवराम पुंजा आरोटे यांच्या स्मरणार्थ बांधण्यात आलेल्या संरक्षण भिंतीच्या भव्य प्रवेशद्वाराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर साई लॉन्स, इंदोरी येथे सेवापूर्ती सोहळा उत्साहात पार पडला.

यावेळी राजेंद्र सोनवणे यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेणारी चित्रफीत दाखविण्यात आली. अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीच्या वतीने कार्यकारी विश्वस्त वैभवराव पिचड यांच्या हस्ते सोनवणे यांना सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

यावेळी वैभवराव पिचड म्हणाले की, राजेंद्र सोनवणे यांना अनेक वर्षांपासून ओळखत असून त्यांनी ज्या-ज्या विद्यालयात सेवा बजावली, तेथे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून विद्यालयाच्या प्रगतीत योगदान दिले. त्यांचा जनसंपर्क मोठा असून त्याचा फायदा त्यांनी विद्यालयासाठी करून दिला. शिक्षक संघटनेच्या माध्यमातून त्यांनी शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठीही काम केले. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

संस्थेशी व कर्तव्याशी प्रामाणिक राहिल्याने मेहेंदुरी ग्रामस्थांच्या मागणीनुसार संस्थेने त्यांची पुन्हा मेहेंदुरी विद्यालयात बदली केली. त्यांच्या यशस्वी कारकिर्दीत पत्नी सौ. सुनंदा ताई यांचेही मोठे योगदान असल्याचे पिचड यांनी नमूद केले. यापुढील काळातही सोनवणे यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय राहावे, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

आ. किशोर दराडे म्हणाले की, मला आमदार करण्यासाठी राजेंद्र सोनवणे यांनी अकोले तालुक्यातून मोठे मताधिक्य मिळवून देण्यासाठी संघटनात्मक पातळीवर महत्त्वपूर्ण काम केले. कर्तव्यनिष्ठ सेवा, विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठीचे योगदान आणि शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा हा गौरव असल्याचे त्यांनी सांगितले.




माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी सोनवणे यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचे कौतुक करून सकारात्मक विचाराने कर्तव्य बजावणाऱ्या सोनवणे यांनी सेवेनंतरही समाजासाठी कार्यरत राहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी उपस्थित अनेक मान्यवरांनी मनोगतातून त्यांच्या कार्याचा गौरव केला.

सत्काराला उत्तर देताना राजेंद्र सोनवणे म्हणाले की, श्री छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय, मेहेंदुरी येथील सेवापूर्ती गौरव सोहळा कायम स्मरणात राहील. संस्थेने व संघटनेने दिलेली प्रत्येक जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडल्याचे समाधान आहे.

प्रास्ताविक संस्थेचे सेक्रेटरी सुधाकरराव देशमुख यांनी केले. सन्मानपत्राचे वाचन शिक्षिका प्रतिभा कडलग यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रा. विवेक वाकचौरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हेमंत सोनवणे व प्रा. सोपान कोरडे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी सोनवणे यांच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते.